आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
सोमवार दिनांक १६ जून २०२५

ठळक बातम्या

1. २०२७ मध्ये होणाऱ्या जनगणनेची आणि पहिल्यांदाच होणाऱ्या जातनिहाय जनगणनेची अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध.

2. कार्यक्षमता, वेग आणि अचूकता यांच्या बळावर भारत आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी बजावत असल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन.

3. खाजगी टूर्स अँड ट्रॅव्हल्स कंपन्यांनी एसटी सोबत संयुक्तपणे सहली आयोजित करव्यात - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक.

4. अमरावती जिल्ह्यातील निम्न पेढी प्रकल्प बाधीतांना 101 कोटीचे सानुग्रह अनुदान मंजूर, पहिला टप्प्यात 57.50 कोटी रुपये प्राप्त.

अधिसूचना

२०२७ मध्ये होणाऱ्या जनगणनेची आणि पहिल्यांदाच होणाऱ्या जातनिहाय जनगणनेची अधिसूचना आज राजपत्रात प्रसिद्ध झाली. ही १६वी राष्ट्रीय जनगणना असून भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची आठवी जनगणना आहे. देशभरात ३४ लाख प्रगणक आणि निरीक्षक, एक लाख तीन हजारांहून जास्त अधिकारी आधुनिक मोबाईल डिजिटल प्रणालीद्वारे या प्रक्रियेत सहभागी होणार आहेत. जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात घरांची यादी, मालमत्ता आणि सुविधा या माहितीचं संकलन, दुसऱ्या टप्प्यात सामाजिक-आर्थिक आणि जात विषयक माहिती संकलन करण्यात येणार आहे. या प्रक्रियेत डिजिटल ॲप आणि स्वगणनेची सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे. देशातल्या बर्फाळ प्रदेशात जनगणनेसाठी एक ऑक्टोबर २०२६ हा संदर्भ दिनांक निश्चित करण्यात आला आहे. तर उर्वरित देशात एक मार्च २०२७ हा संदर्भ दिनांक असेल.

आपत्ती व्यवस्थापन-अमित शाह

गेल्या दहा वर्षात भारताने आपली कार्यक्षमता, वेग आणि अचूक व्यवस्थापन यांच्या बळावर आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी केल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्ली इथे राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मदतकार्य आयुक्त आणि आपत्ती प्रतिसाद दलांच्या परिषदेला संबोधित करत होते.

*विगत दो वर्ष से हमने राहत और आपदा प्रबंधन दोनों से जुड़ी हुई सभी एजेंसियों के वर्कशाप को, उनकी मीटिंग को एकत्रित कर के, एक ही मीटिंग के अंदर, एक ही वर्कशाप के अंदर, ढेर सारी एजेंसियों को एकत्रित कर कर। एक होल ऑफ़ गवर्नमेंट एप्रोच के साथ विचार का ये मंच बनाने का काम किया।*

विविध प्रकारच्या संकटांमध्ये बचावकार्य करण्यासाठी जिल्हा पातळीवर आपत्ती व्यवस्थापन योजना असणं महत्त्वाचं आहे, असं सांगताना विविध राज्यांच्या मदतकार्य आयुक्तांना पुढच्या ९० दिवसात प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करण्याच्या सूचनाही शहा यांनी' दिल्या. हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढीमुळे आज संपूर्ण जगाला संकटं भेडसावत आहेत. गेल्या दहा वर्षांत मात्र, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण NDMA, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल NDRF आणि आपत्ती प्रतिरोधक कोअलिशन CDRI यांच्या बळावर गेल्या दहा वर्षात भारत आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात जगाचं नेतृत्व करत आहे, असंही ते म्हणाले.

महागाई दर

भारताचा घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित वार्षिक महागाई दर मे महिन्यात ३९ शतांश टक्क्यापर्यंत घसरला असल्याची माहिती वाणिज्य आणि उद्योग मंत्रालायने जाहीर केलेल्या आकडेवारीत म्हटलं आहे. यात १ पूर्णांक ७२ शतांश टक्क्याची घट झाली आहे. वीज आणि इंधनाच्या किमतीही २ पूर्णांक २७ शतांश टक्क्यानी कमी झाल्या आहेत. उत्पादन क्षेत्रातल्या महागाई दरात दोन टक्क्याहून अधिक वाढ झाल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या आकडेवारीत म्हटलं आहे.

'सूर्यघर'-मोफत वीज

प्रधानमंत्री 'सूर्यघर'-मोफत वीज योजना महाराष्ट्रात वेगाने आकार घेत आहे. या योजनेत नागपूर जिल्ह्याने  नेतृत्व स्वीकारले असून, सौर ऊर्जा निर्मितीत जिल्ह्याने राज्यात सर्वोत्कृष्ट कामगिरी नोंदवत आपली आघाडी कायम ठेवली आहे. नवीनतम आकडेवारीनुसार, १५ जून २०२५ रोजीपर्यंत नागपूर जिल्ह्याने तब्बल ३३,६४१ छतावरील सौर ऊर्जा निर्मिती संच यशस्वीरित्या स्थापित केले आहेत. ही संख्या राज्यातील इतर कोणत्याही जिल्ह्यापेक्षा लक्षणीयरीत्या जास्त आहे. १५ जून २०२५ रोजी एकाच दिवसात नागपूरमध्ये १२४ नवीन सौर वीज निर्मिती संच उभारण्यात आले, ज्यांची स्थापित वीज निर्मिती क्षमता

४५२.४४ किलोवॅट आहे. या आकडेवारीनुसार, जळगाव, पुणे, छत्रपती संभाजीनगर यांसारख्या प्रमुख जिल्ह्यांच्या तुलनेत नागपूरने मोठी आघाडी घेतली आहे.

इंद्रायणी नदी अपघात

पुणे जिल्ह्यात इंद्रायणी नदीवरचा पूल कोसळून झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत ४ जणांचा मृत्यू झाला, तर ५१ जणांना वाचवण्यात यश आलं आहे. त्यापैकी ८ जणांची प्रकृती गंभीर आहे. दोन ते तीन जण अद्यापही बेपत्ता असून त्यांचा शोध सुरू आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी या दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं असून, या प्रकाराची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.

एसटी-टूर्स अँड ट्रॅव्हल्स

सर्वसामान्य प्रवाशांना धार्मिक स्थळांना भेटी देता याव्यात यासाठी खाजगी टूर्स अँड ट्रॅव्हल्स कंपन्यांनी एसटी सोबत संयुक्तपणे सहली आयोजित करव्यात जेणेकरून सर्वसामान्य प्रवाशांना कमी खर्चात निवास आणि भोजन व्यवस्थेसह धार्मिक पर्यटनाचा आनंद लुटता येईल! या योजनेत राज्यातील सर्व टूर्स अँड ट्रॅव्हल्स कंपन्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले. ते या अनुषंगाने एसटी महामंडळाच्या मुख्यालयात बोलावलेल्या बैठकीमध्ये बोलत होते. राज्यातील गोर-गरीब जनतेला धार्मिक पर्यटनाचा आनंद लुटता यावा यासाठी खाजगी टूर्स अँड ट्रॅव्हल्स कंपन्यांनी एसटी महामंडळाच्या माध्यमातून कमी गर्दीच्या दिवसात सहलीचे आयोजन करावे. यासाठी पंढरपूरच्या धर्तीवर तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी भाविक पर्यटकांना स्वच्छतागृह व निवास व्यवस्था नि:शुल्क उपलब्ध करून देण्यात येईल.या उपक्रमाची सुरुवात येत्या श्रावण महिन्यापासून करण्यात यावी अशा सूचना मंत्री सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिल्या आहेत.

सायकल वारी

विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरच्या वारीची ओढ सर्वांनाच लागली असून नागपूर ते पंढरपूर अशी सायकल वारी देखील निघाली आहे. यवतमाळ मध्ये या वारीचा पहिला मुक्काम झाला. क्रीडा भारती आणि टायगर ग्रुप ऑफ ऍडव्हेंचर ने आयोजित केलेल्या या वारीत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत 13 ते 83 वयोगटातील सायकल पटू सहभागी झाले आहेत. यात आठ महिला सायकलपटूंचा लक्षणीय सहभाग आहे. 20 जूनला पंढरपूर येथे राज्यभरातून आलेल्या 90 सायकलिंग क्लब चे सायकल संमेलन आणि सायकलचा रिंगण सोहळा देखील पार पडणार आहे. यात तीन हजारावर सायकल पटू सहभागी होतील.

चंद्रशेखर बावनकुळे

अमरावती जिल्ह्यातील दुसरा मोठा प्रकल्प असलेल्या निम्न पेढी प्रकल्पातील बाधितांना 101 कोटींचे सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले आहे. यातील पहिल्या टप्प्यात 57 कोटी 50 लाख रूपयांचा निधी प्राप्त झाला आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने निधी प्राप्त झाला असून त्याचे वाटप लवकरच होणार आहे. यामुळे प्रकल्पाच्या कामाला गती येणार आहे. निम्न पेढी प्रकल्पातील पाच गावांच्या पुनर्वसनाला गती देण्यात आली आहे. या गावातील नागरिकांना हेक्टरी पाच लाख रुपये सानुग्रह निधी मिळावा यासाठी गेल्या दहा वर्षांपासून आंदोलने झाली. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याप्रकरणी दखल घेत तातडीने याबाबत बैठक आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या सहमतीने निम्न पेढी प्रकल्पग्रस्तांना पाच लाख रुपयाचे सानुग्रह अनुदान मंजूर करून प्रकल्पाची वाट मोकळी करून दिली आहे. सानुग्रह निधी 5 गावातील 845 लाभार्थ्यांना मिळणार आहे. सध्या या प्रकल्पाला 101 कोटी रुपये मंजूर झाले असून 57.50 कोटी रुपयांचा निधी पहिल्या टप्प्यात प्राप्त झालेला आहे.

महिला क्रिकेट विश्वचषक

आयसीसी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं महिलांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या तारखांची घोषणा केली आहे. या स्पर्धेची सुरुवात येत्या ३० सप्टेंबर रोजी बेंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर होईल. स्पर्धेचा पहिला सामना भारत आणि श्रीलंका या दोन संघांमध्ये खेळवला जाईल. या स्पर्धेची उपांत्य फेरी २९ आणि ३० ऑक्टोबर रोजी होणार असून अंतिम सामना २ नोव्हेंबर रोजी खेळवला जाईल. स्पर्धेतला बहुप्रतिक्षित भारत विरुद्ध पाकिस्तान हा सामना येत्या ५ ऑक्टोबर रोजी होणार आहे. हा सामना श्रीलंकेत आर. प्रेमदासा स्टेडियमवर दुपारी ३ वाजता सुरू होईल.

हवामान

आगामी काही तासात विदर्भातील अकोला, वाशीम आणि यवतमाळ जिल्ह्यांमध्ये वादळी वारे आणि विजेच्या कडकडाटासह काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे.

मध्य रेल्वे

मध्य रेल्वेच्या गाडी क्रमांक 12843 मधील इंजिनजवळील जनरल डब्यात सुमारे 3 वर्षांचा मुलगा आई कळमणा स्थानकावर उतरली असता डब्यातच राहिल्याची घटना घडली. ही माहिती मिळताच चाइल्ड लाइनच्या प्रतिनिधीच्या मदतीने थोड्याच वेळात प्रवासासाठी

वैध तिकीट दाखवून संबंधित सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मुलाला कुटुंबियांच्या ताबयात देण्यात आले.

आरोग्य शिबीर

राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत 17 मे ते 16 जून 2025 पर्यंत संपूर्ण महिनाभर गोंदिया जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणुन आज गोंदिया ग्रामीण पोलीस स्टेशन इथं आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले. या शिबिरात सुमारे ८० पोलिस कर्मचारी आणि अधिकारी यांच्या रक्तदाब आणि साखरेची तपासणी करण्यात आली. जिल्हा पोलीस दलातील कार्यरत अधिकारी आणि अंमलदार यांचे आरोग्य सुदृढ रहावे या उद्देशाने आरोग्य विभागामार्फत हा उपक्रम घेण्यात आला.

*****